# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ४०

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **बुधवार दिनांक ०३/१२/२०२५ दुपारी ४-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| **अ.क्र.** | **अधिकाऱ्यांचे नाव** | **पदनाम** |
|---|---|---|
| १. | श्री नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति. आयुक्त |
| ३. | श्री किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ४. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ५. | श्री बाळासाहेब तट्टू | मुख्य लेखाअधिकारी |
| ६. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्री वर्षा घुगरी | कार्य. अभियंता बांधकाम |
| ९. | श्री नवनित सोनवणे | कार्य. अभियंता पा.पु. |
| १०. | श्री एम.आर शेख | प्र. आरोग्य अधिकारी |
| ११. | श्री राजेंद्र माईनकर | प्र. भांडारपाल |
| १२. | श्री संजय मोरे | कार्या.अधिक्षक आस्थापना विभाग |
| १३. | श्री चंद्रकांत मोरे | प्र. लेखापाल लेखा विभाग |
| १४. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १५. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| १६. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता, नगररचना |
| १७. | श्री कमलेश सोनवणे | सहा.अभियंता, नगररचना |
| १८. | श्री हेमंत पावटे | सह. अभियंता, बांधकाम |
| १९. | श्री प्रसाद जाधव | अतिक्रमण अधिक्षक |
| २०. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २१. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष अधिकारी |
| २२. | श्री तेजस सोनवणे | शिक्षण मंडळ |
| २३. | श्रीमती मिना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| २४. | लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २५. | अनिल भडागे | वाहन विभाग प्रमुख |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-६३५ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३९ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१३ दिनांक ०३/१२/२०२५**

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३९ दिनांक १४/११/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ५८८ ते ६१२ क्रमश:वाचून कायम करण्यांत येत आहे. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३६ धुळे महानगरपालिकेच्या सुकवद पंपिंग स्टेशन व बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथील जुने पंपसेट, ट्रान्सफॉर्मर तसेच कंट्रोल पॅनल लिलाव करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक लिलाव कोणत्या पध्दतीने करणार.

उपअभियंता मनपा संकेतस्थळावरुन प्रसिध्द करुन.

मा.आयुक्त तथा प्रशासक व्हॅल्युएशन करेक्ट आहे.

मा. उपअभियंता शासकीय दरानुसार केले आहे. लिलावात कोणीही भाग घेवु शकतो.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१४ दिनांक ०३/१२/२०२५**

केंद्र शासनाच्या प्रशासकीय मान्यता अन्वये अमृत योजना टप्पा क्र. १ व २ अंतर्गत दि.03 नोव्हेबर 2025 पर्यंत धुळे महानगरपालिकेच्या बाभळे व सुकवद पंपिंग स्टेशन येथील पाणीपुरवठा यंत्रणेसाठी नवे पंप, ट्रान्सफॉर्मर तसेच कंट्रोल पॅनल बसविण्याचे काम पूर्ण झाले आहे. तसेच अजून बाकी नवीन साहित्य बसविण्याचे काम प्रस्तावित आहे.सदर पाणीपुरवठा केंद्रांवरील पूर्वी सन 1982 मध्ये उपकरणे आस्थापित करण्यात आली होती ,सदर ठिकाणी पूर्वी बसविण्यात आलेले (सन 1982 मधील) पंप, ट्रान्सफॉर्मर, पॅनल इ. साहित्य हे नवीन तंत्रज्ञान उपलब्ध झाल्यामुळे अप्रचलित झाले असून कार्यक्षमतेअभावी त्यांचा वापर करणे शक्य नाही.म्हणूनच नवीन मंजूर उपकरणे बसविण्यात आली असून जुने उपकरणे बदल्यात काढण्यात आली आहेत.दीर्घ कालावधीतील वापर, जीर्ण अवस्था तसेच नव्या तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे ही उपकरणे आता पूर्णतः अप्रचलित व वापरास अयोग्य ठरली आहेत. सदर जुने साहित्य अनुपयोगी व निष्प्रयोज्य स्वरूपाचे असल्याने त्याचा लिलाव प्रक्रियेद्वारे विल्हेवाट लावणे आवश्यक आहे.अमृत योजना अंतर्गत मंजूर झालेल्या नव्या उपकरणांमुळे पाणीपुरवठा यंत्रणेची कार्यक्षमता, ऊर्जा बचत व नियंत्रण प्रणाली सुधारित झाली आहे. नवीन पंप, ट्रान्सफॉर्मर, नियंत्रण पॅनल हे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित असल्याने जुन्या प्रणालीच्या तुलनेत अधिक कार्यक्षम व टिकाऊ आहेत. त्यामुळे जुन्या उपकरणांची उपयुक्तता संपुष्टात आली असून ती आता निष्प्रयोज्य व अनुपयोगी स्वरूपाची झाली आहेत.

सदर जुनी उपकरणे (पंप, ट्रान्सफॉर्मर, पॅनल इ.) आता अनुपयोगी व निष्प्रयोज्य ठरली असून त्यांची नोंद शिल्लक माल म्हणून करण्यात आली आहे.

प्रस्तावात नमूद जुनी उपकरणे (पंप, ट्रान्सफॉर्मर, कंट्रोल पॅनल इ.) बदल्यात काढण्यात आली असून ती धुळे महानगरपालिका यांचे शिल्लक माल म्हणून नोंदविणे आल्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासन नियमांनुसार अशा प्रकारचा निष्प्रयोज्य माल लिलाव प्रक्रियेद्वारे विक्रीस काढून संबंधित महसूल महानगरपालिका निधीत जमा करणे अपेक्षित आहे.

सदर राज्य दर सूचीतील सूचनांप्रमाणे, कामाच्या दरपत्रकात वापरात नसलेल्या अथवा बदल्यात काढलेल्या जुन्या साहित्याचे मूल्य कपात करून दाखविणे आवश्यक आहे.त्यानुसार, अमृत योजना टप्पा क्र. 1 व 2 अंतर्गत बसविण्यात आलेल्या नवीन उपकरणांच्या बदल्यात जुनी उपकरणे (पंप, ट्रान्सफॉर्मर, कंट्रोल पॅनल इत्यादी) या Credit for Dismantled Material तरतुदीनुसार गणना करण्यात आली असून, त्याची एकूण किंमत रु. 39,97,600/- (रुपये एकोणचाळीस लाख सत्त्याण्णव हजार सहाशे फक्त) एवढी ठरते.

सदर किंमत ही जुन्या उपकरणांच्या अंदाजे वाजवी बाजारमूल्याच्या अनुषंगाने आणि दरसूचीतील प्रचलित निकषांनुसार निश्चित करण्यात आलेली आहे.वरीलप्रमाणे Credit for Dismantled Material नुसार मूल्यांकन केलेली एकूण रक्कम रु.39,97,600/- नुसार पुढील लिलाव प्रक्रिया राबविणे प्रस्तावित आहे. सदर बाभळे व सुकवद पंपिंग स्टेशन येथील जुने पंप, ट्रान्सफॉर्मर, पॅनल व इतर विद्युत साहित्य हे “महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत कामांसाठी राज्य दर सूची – सन 2022-23 (Schedule of Rates) मधील Credit for Dismantled Material या तरतुदीनुसार मूल्यांकन करण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने बाभळे व सुकवद पंपिंग स्टेशन येथील जुन्या व अनुपयोगी उपकरणांचा लिलाव धुळे महानगरपालिका संकेतस्थळावर (Website) प्रसिद्ध करून लिलाव प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. तसेच, अद्याप नवीन साहित्य बसविणे बाकी असून संबंधित कामे पूर्ण झाल्यानंतर त्या ठिकाणाहून निघणाऱ्या जुन्या साहित्याबाबत स्वतंत्र प्रस्ताव स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल.

सदर लिलाव प्रक्रिया राबविण्यापूर्वी स्थायी समितीकडून आवश्यक मान्यता प्राप्त करणे बंधनकारक आहे. म्हणूनच वरीलप्रमाणे जुने उपकरणे लिलावाद्वारे विक्रीस काढण्यास मे. स्थायी समितीपुढे मान्यतेस्तव प्रस्तावा सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेच्या सुकवद पंपिंग स्टेशन व बाभळे जलशुद्धीकरण केंद्र येथील जुने पंपसेट, ट्रान्सफॉर्मर तसेच कंट्रोल पॅनल लिलाव करणेस मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३७ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ मध्ये रामचंद्र नगर येथे दक्षिण मुखी मारोती मंदिर परिसरात पायाभुत सुविधा विकास करणे कामी फेर निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात पायाभुत सुविधा काय काय करणार आहे.

उपअभियंता तेथे वॉल कंपाऊंड व आतील भागात सुशोभिकरण करणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१५ दिनांक ०३/१२/२०२५**

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ मध्ये रामचंद्र नगर येथे दक्षिण मुखी मारोती मंदिर परिसरात पायाभुत सुविधा विकास करणे (फेर निविदा) बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१०५३/ २०२४-२५ दि.०७/१०/२०२४ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ३१,९८,५६७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./३४९/२०२४-२५ दि.२७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. ३१,९८,५६७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गिरीष प्रमोद बाविस्कर | शे. १.२० % कमीने | सर्वात कमी दर |
| २ | मे.अे.के.सैफी | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | मे. जितेंद्र संजय पाटील | शे. २.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/मे.गिरीष प्रमोद बाविस्कर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ३१,६०,१८३/- इतक्या रक्कमेचे असून शे.१.२०% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.गिरीष प्रमोद बाविस्कर यांचे दर शे.१.२०% कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.गिरीष प्रमोद बाविस्कर यांची शे.१.२०% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर. तसेच कलम ४५२ अ च्या (१अ ) नुसार मे.स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजना सन २०२४-२५ अंतर्गत प्र.क्र.११ मध्ये रामचंद्र नगर येथे दक्षिण मुखी मारोती मंदिर परिसरात पायाभुत सुविधा विकास करणे कामी श्री/मे.गिरीष प्रमोद बाविस्कर यांची शे. १.२० % कमीने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३८ — धुळे महानगरपालिकेचे गेट नं. ३, ८० फुटी रोड सावता माळी मार्केट विकसित करणे (भाग-२) कामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता — यापुर्वी १० कोटी मध्ये ग्राऊंड फलोअर प्रस्तावित आहे. आता या १६ कोटीमध्ये पहिला मजला व दुसरा मजला करणे प्रस्तावित आहे. पहिल्या मजल्यावर ४७ शॉप असतील आणि दुसऱ्या मजल्यावर गेम्स झोन, मल्टीप्लेक्स असणार आहे. हे मनपा फंडातुन करणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — रिव्हाईज बजेट मध्ये प्रोव्हिजन करुन घ्यावी मगच पुढील कार्यवाही करावी.सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१६ दिनांक ०३/१२/२०२५**

धुळे महानगरपालिकेचे गेट नं.३,८० फुटी रोड सावता माळी मार्केट विकसित करणे (भाग-२) बाबतच्या कामास धुळे म.आयुक्त सो., यांचे पत्र जा.क्र./धुमपा/बां.वि./५३/२०२५-२६ दि.२०/०८/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. १६,००,५३,३२३/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत उप.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१०१ अ /२०२५-२६ दि. २०/०८/२०२५अन्वये रक्कम रु. १६,००,५३,३२३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा प्रसिद्ध करणेत येऊन दि.०९/०९/२०२५ पर्यंत निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. मिलिंद मुडावदकर | शे. -०.६०० % कमीने | सर्वात कमी दर |
| २ | मे. डी.आर.पाटील कन्सट्रक्शन | शे. १.००० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे १५,९०,९३,००३/- इतक्या रक्कमेचे असून शे. -०.६००% कमी दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांचे दर शे. -०.६०० % कमी आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांची शे. -०.६०० % कमी दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर. तसेच अन्य काम न मिळालेले ठेकेदारांना त्यांची बयाणा रक्कम परत करणे बाबत मंजुरीस्तव सादर. तसेच कलम ४५२ अ च्या (१अ ) नुसार मे.स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिकेचे गेट नं.३, ८० फुटी रोड सावता माळी मार्केट विकसित करणे (भाग-२) कामी श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांची दर शे. -०.६०० % कमी या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६३९ नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत सन २०२५-२६ सिद्धेश्वर गणपती मंदिर ते स्वामी समर्थ मंदिर ते मोठा पूल व झाशी राणी पुतळा ते अग्रवाल भवन पर्यंत व्हाईट टॉपिंग (कॉंक्रीट) करणे कामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक रस्ता मनपा मालकीचा आहे का.

मा. उपअभियंता मनपा मालकीचा रस्ता आहे. निविदा दर अंदाजपत्रकीय दराने आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात लेअरवाईज फोटोग्राफ मेन्टेन करावे. तसेच यापुढे डांबरी कामाचे रस्ते होतील त्याचे कोअर कटींग करुन त्या बाजुला स्केल उभी करुन त्याचा फोटा घ्यावा. म्हणजे इस्टीमेट प्रमाणे लेअर्सचे कोअर लक्षात येईल. त्याशिवाय बिले निघणार नाही. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१७ दिनांक ०३/१२/२०२५**

नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत सन २०२५-२६ सिद्धेश्वर गणपती मंदिर ते स्वामी समर्थ मंदिर ते मोठा पूल व झाशी राणी पुतळा ते अग्रवाल भवन पर्यंत व्हाईट टॉपिंग (कॉंक्रीट) करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/९६३/२०२५ दि.३१/१०/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ५,४८,८६,९६७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२१०/२०२५-२६ दि. ३१/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. ५,४८,८६,९६७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. मिलिंद मुडावदकर | अंदाजपत्रक दर | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. डी.आर.पाटील कन्सट्रक्शन | शे. १.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ५,४८,८६,९६७/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांचे दर अंदाजपत्रक आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत सन २०२५-२६ सिद्धेश्वर गणपती मंदिर ते स्वामी समर्थ मंदिर ते मोठा पूल व झाशी राणी पुतळा ते अग्रवाल भवन पर्यंत व्हाईट टॉपिंग (कॉंक्रीट) करणे कामी श्री/ मे.मिलिंद मुडावदकर यांची अंदाजपत्रक दराने आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

सदर कामाचे अंतिम देयक सादर करतांना अंदाजपत्रकातील बाबनिहाय कोअर कट करुन स्तरनिहाय (लेअरवाईज) फोटोग्राफ सादर करणे बंधनकारक राहिल. वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४० जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२५-२६ प्र.क्र.२ राज नगर सर्व्हे नं.१३१ येथील खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे कामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक — रस्ता मनपा मालकीचा आहे का. तसेच ७/१२ वर नाव लावले आहे का. निविदा दर

उपअभियंता — जागा मनपाची आहे. ७/१२ वर नाव लावले आहे. निविदा दर अंदाजपत्रकीय दराने आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१८ दिनांक ०३/१२/२०२५**

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२५-२६ प्र.क्र.२ राज नगर सर्व्हे नं.१३१ येथील खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र जावक क्र.जिनिस/O/२०२५/Oct/AAO/०१८८७ दि.३१/१०/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ३७,९६,५८१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./१८९/२०२५-२६ दि.१०/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. ३७,९६,५८१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. सिद्धेश प्रविण चौधरी | अंदाजपत्रक दर | सर्वात कमी दर |
| २ | मे. सौरभ संजय कदमबांडे | शे. १.०० % जास्तीने | |
| ३ | मे. हेमंत राजाराम बागुल | शे. २.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.सिद्धेश प्रविण चौधरी यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे 37,96,581/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/ मे.सिद्धेश प्रविण चौधरी यांचे दर अंदाजपत्रक आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/ मे.सिद्धेश प्रविण चौधरी यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर मंजुरीस्तव सादर करण्यात आलेला आहे. उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत सन २०२५-२६ प्र.क्र.२ राज नगर सर्व्हे नं.१३१ येथील खुल्या जागेस संरक्षण भिंत बांधणे कामी श्री/ मे.सिद्धेश प्रविण चौधरी यांची अंदाजपत्रक दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४१ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२५-२६ धुळे शहरातील संतोषी माता चौक ते विठ्ठल मंदीर पर्यंत विद्युत पोल एलईडी कव्हर बसविणे तसेच नगाळबारी ते गुरुद्वारा पर्यंत विद्युत पोल उभारणे व एलईडी कव्हर लावणे कामी (एलईडी बल्ब, हाय मास्ट, सोलार हाय मास्ट वगळून) निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक किती रक्कमेची निविदा आहे.

उपअभियंता रु. १,४९,९६,२३२,/- रकमेची निविदा आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक एल ई डी कव्हर म्हणजे काय.

उपअभियंता ही आमदार महोदयांची संकल्पना आहे. आपण नगावबारीपासुन गुरुव्दारापर्यंत आग्रारोड आहे. यामध्ये एमएसईबीचे जे पोल आहे. त्यावर एस टी लाईन व एल टी लाईन आहे. एल टी लाईन काढुन डिव्हायडर चे पोल आहे त्यांना सव्वा फुट बाय सव्वा फुट डिझायनर बॉक्स येणार आहे. आणि एल ई डी लाईटस येतील त्यात. हे काम मुलभुत सोयी सुविधा मधील आहे. यात १०० टकके अनुदान आहे. तसेच निविदा शे. ०.०१ कमी दराने आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६१९ दिनांक ०३/१२/२०२५**

धुळे शहरातील संतोषी माता चौक ते विठ्ठल मंदीर पर्यंत विद्युत पोल एलईडी कव्हर बसविणे तसेच नगाळबारी ते गुरुद्वारा पर्यंत विद्युत पोल उभारणे व एलईडी कव्हर लावणे. (एलईडी बल्ब, हाय मास्ट, सोलार हाय मास्ट वगळून) [महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२५-२६]

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावान्वये व मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्र. १२ / क/कक्ष /५ / नपाप्र/बांध/ १००१/२०२५ दि. ११/११/२०२५ अन्वये अन्वये रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. १,४९,९७,७३२/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. हेमंत दयाराम सोनवणे. | शे. +३ जास्त दराने | |
| २ | मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे | शे. -०.०१ कमी दराने | L1 |
| ३ | मे अंबिका इलेक्ट्रीकल्स ,धुळे | शे. +५ जास्त दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. १,४९,९६,२३२.२३/- इतक्या रकमेची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -०.०१ कमी दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय शे. -०.०१ / कमी / जास्त आहेत. त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची रक्कम रु. १,४९,९६,२३२.२३/- अंदाजपत्रकीय / शे.-०.०१ कमी / जास्त दराने आलेले निविदा दर कलम ४५२ अ च्या (१ अ)व (१ ब)नुसार महानगरपालिका स्थायी समिती पुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२५-२६ धुळे शहरातील संतोषी माता चौक ते विठ्ठल मंदीर पर्यंत विद्युत पोल एलईडी कव्हर बसविणे तसेच नगाळबारी ते गुरुद्वारा पर्यंत विद्युत पोल उभारणे व एलईडी कव्हर लावणे कामी (एलईडी बल्ब, हाय मास्ट, सोलार हाय मास्ट वगळून) मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची शे. -०.०१ कमी दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४२ महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२५-२६ धुळे शहरातील मनोहर चित्र मंदीर, छत्रपती शिवाजी महाराज चौक व आग्रा रोड गांधी पुतळा पर्यंत विद्युत पोल उभारणेकामी (एलईडी बल्ब, हाय मास्ट, सोलार हाय मास्ट वगळून). निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.उपअभियंता धुळे शहरातील मनोहर चित्र मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक व आग्रारोड गांधीपुतळा पर्यंत या ठिकाणी महावितरण कडुन भुमिगत केबल टाकण्याचे काम सुरु आहे. या ठिकाणी अस्तित्वातील एमएसईबी चे जे पोल आहे. ते सर्व डिसमेंटल होणार आहे. त्या ठिकाणी नविन

पोल उभे करतोय आणित्यावर डिझाईन म्हणुन एल ई डी लावतोय हे काम १०० टक्के अनुदानातील आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात जागा मालकी नॅशनल हायवेची आहे. यात डीपी रोड किती रुंदीचा आहे.

मा. उपअभियंता १४ फुट आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यात तुम्ही युटिलीटी अंडरग्राऊंड करतायेत त्यांच्याकडुन स्केच घेतले का की कोणत्या पोर्शनमधुन अंडरग्राऊंड करायचे.

मा.उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाने दिले आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक पुढे चालुन मनपावर बर्डन येता कामा नये की, पुन्हा युटिलीटी शिफट करावी म्हणुन.

उपअभियंता सार्वजनिक बांधकाम विभागाने मार्किंग केली आहे. त्याप्रमाणे महावितरणचे केबलचे काम सुरु आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक तेथे मनपाच्या काही युटीलीटीज आहे का वॉटर सप्लाय, ड्रेनेज वगैर

मा.उपअभियंता हो आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक त्याचे कसे करणार असे नको व्हायला दुसरी युटीलिटी ओपन झाली आणि ती शिफट करावी लागणार किंवा त्याचा वेगळा खर्च तेवढे कोऑर्डीनेशन ठेवुन कामे करावी. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६२० दिनांक ०३/१२/२०२५**

धुळे शहरातील मनोहर चित्र मंदीर, छत्रपती शिवाजी महाराज चौक व आग्रा रोड गांधी पुतळा पर्यंत विद्युत पोल उभारणे. (एलईडी बल्ब, हाय मास्ट, सोलार हाय मास्ट वगळून). [महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२५-२६]

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावान्वये व मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्र. १२ / क/कक्ष /५ / नपाप्र/बांध/ १००१/२०२५ दि. ११/११/२०२५ अन्वये अन्वये रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. २,४९,९८,४२८/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. हेमंत दयाराम सोनवणे. | शे. +३ जास्त दराने | |
| २ | मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे | शे. -०.०१ कमी दराने | L1 |
| ३ | मे अंबिका इलेक्ट्रीकल्स ,धुळे | शे. +५ जास्त दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. २,४९,९५,९२८.१६ /- इतक्या रकमेची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -०.०१ कमी दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय शे. -०.०१ / कमी / जास्त आहेत. त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची रक्कम रु. २,४९,९५,९२८.१६/- अंदाजपत्रकीय / शे.-०.०१ कमी / जास्त दराने आलेले निविदा दर मान्यतेस्तव स्थायी समिती पुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजना सन २०२५-२६ धुळे शहरातील मनोहर चित्र मंदीर, छत्रपती शिवाजी महाराज चौक व आग्रा रोड गांधी पुतळा पर्यंत विद्युत पोल उभारणेकामी (एलईडी बल्ब, हाय मास्ट, सोलार हाय मास्ट वगळून). ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची शे. -०.०१ कमी दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४३ नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत मोठा पूल येथे दोन्ही बाजूस विद्युत व्यवस्था करणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता यामध्ये मोठया पुलावर कमान येणार आहे.समृध्दी हायवेला कमानी आहे त्याप्रकारे असणार. दोन्ही बाजुला त्यावर एलईडी असणार आहे. निवीदा शे. -०.०१ टक्के कमी दराने असणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६२१ दिनांक ०३/१२/२०२५**

मोठा पूल येथे दोन्ही बाजूस विद्युत व्यवस्था करणे.. [नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६] उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावान्वये व मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्र. जीनिस/O/गोख/DMF/कावि /१२७/२०२५ दि.१२/०८/२०२५ अन्वये अन्वये रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. ४९,४८,५५०/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. हेमंत दयाराम सोनवणे. | शे. +३ जास्त दराने | |
| २ | मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे | शे. -०.०१ कमी दराने | L1 |
| ३ | मे अंबिका इलेक्ट्रीकल्स ,धुळे | शे. +५ जास्त दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. ४९,४८,०५५.१५/- इतक्या रकमेची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -०.०१ कमी दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय शे. -०.०१ / कमी / जास्त आहेत. त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची रक्कम रु. ४९,४८,०५५.१५/- अंदाजपत्रकीय / शे.-०.०१ कमी / जास्त दराने आलेले निविदा दर स्थायी समिती पुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत मोठा पूल येथे दोन्ही बाजूस विद्युत व्यवस्था करणेकामी मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची शे. -०.०१ कमी दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४४ नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत देवपूर भागातील आय टी आय कॉलेज ते पंचवटी ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते दसेरा मैदान पर्यंत LT लाईन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता हा विषय देखील विषय क्र.६४१ प्रमाणे आहे. विषय मंजुरीस हरकत नसावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६२२ दिनांक ०३/१२/२०२५**

देवपूर भागातील आय टी आय कॉलेज ते पंचवटी ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते दसेरा मैदान पर्यंत LT लाईन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणे. [नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६]

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठरावान्वये व मा. जिल्हाधिकारी सो. यांची प्रशासकीय मान्यता यांच्याकडील प्रशासकीय मान्यता आदेश क्र. जीनिस/O/गोख/DMF/कावि /१२७/२०२५ दि.१२/०८/२०२५ अन्वये अन्वये रोजी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रु. १,९९,७९,९५५/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत Online पद्धतीने बयाणा रक्कम भरून/लेटर प्याड वर निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र | कंत्राटदाराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. हेमंत दयाराम सोनवणे. | शे. +३ जास्त दराने | |
| २ | मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे | शे. -०.०१ कमी दराने | L1 |
| ३ | मे अंबिका इलेक्ट्रीकल्स ,धुळे | शे. +५ जास्त दराने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चरPVT LTD, धुळे यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे म्हणजेच रु. १,९९,७७,९५७/- इतक्या रकमेची असुन अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे. -०.०१ कमी दराने आहे.

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून ठेकेदार मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय शे. -०.०१ / कमी / जास्त आहेत. त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चर PVT LTD, धुळे यांची रक्कम रु. १,९९,७७,९५७/- अंदाजपत्रकीय / शे.-०.०१ कमी / जास्त दराने आलेले निविदा दर मे. स्थायी समिती पुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, नागरी दलित्तेतर वस्ती सुधार योजना सन २०२५-२६ अंतर्गत देवपूर भागातील आय टी आय कॉलेज ते पंचवटी ते छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते दसेरा मैदान पर्यंत LT लाईन काढून भूमिगत करणे व विद्युतीकरण करणेकामी मे.समविल पावर & इन्फ्रास्ट्रक्चरPVT LTD, धुळे यांची शे. -०.०१ कमी दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४५ धुळे महानगरपालिका मालकीचे फायनल प्लॉट नं. १५३ येथे निवासस्थान बांधणे कामी आर्थिक व प्रशासकीय मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक आरक्षणाची काही अडचण आहे का. व बजेटमध्ये आहे का.

मा.उपअभियंता आरक्षणाची काही अडचण नाही व बजेटमध्ये तरतुद आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६२३ दिनांक ०३/१२/२०२५**

धुळे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत असते. इतर शहरात आस्थापनेवर शासकीय नियुक्त अधिकारी यांचेसाठी निवासस्थान बांधण्यात आलेली आहेत. तथापि धुळे महानगरपालिकेतील आयुक्त यांचेसाठी निवासस्थान बांधण्यात आलेले नाही. धुळे महानगरपालिकेतील नियुक्त करण्यात आलेले शासकीय अधिकारी यांचेसाठी निवासस्थान बांधणेसाठी धुळे महानगरपालिका मालकीची मौजे फायनल प्लॉट नं.१५३ येथील जागा निश्चित करण्यात आलेली असून नगररचना विभागाच्या अभिप्रायानुसार सदर जागा हि रहिवास विभागात समाविष्ट असून त्यानुसार प्रस्तावित बांधकाम अनुज्ञेय आहे असे नमूद आहे.

त्यानुसार सदर जागेचे अंदाजपत्रक तयार केले असून शासकीय दरसूची सन २०२२-२३ नुसार रु.७८,१८,३५६/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरचा खर्च सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील आयुक्त/अधिकारी निवास बांधणे अंतर्गत रु.१ कोटी मात्रची तरतूद करण्यात आलेली असून धुळे महानगरपालिका मालकीचे फायनल प्लॉट नं.१५३ येथे निवासस्थान बांधणे कामास रु.७८,१८,३५६/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेकामी सदरचा विषय मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, धुळे महानगरपालिका मालकीचे फायनल प्लॉट नं. १५३ येथे आयुक्त निवासस्थान बांधणेसाठी येणाऱ्या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४६ मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत लक्ष्मी नगर मधील सर्व्हे नं.३७/२ येथील खेळाचे मैदान/उद्यान विकसित करणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक जागा मालकी कोणाची, व निविदा दर कसे आहे.

मा. उपअभियंता मनपाची जागा आहे व निविदा दर अंदाजपत्रकीय दराने आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६२४ दिनांक ०३/१२/२०२५**

मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत लक्ष्मी नगर मधील सर्व्हे नं.३७/२ येथील खेळाचे मैदान/उद्यान विकसित करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१००१/ २०२५-२६ दि.११/११/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,९९,६०७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२०७/२०२५-२६ दि.२९/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. २९,९९,६०७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रक दर | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे. ३.०० % जास्तीने | |
| ३ | मे. दिपेश सुभाषकुमार लिलवाणी | शे. ४.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे २९,९९,६०७/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे. वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रक आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर प्रस्ताव मंजुरीस्तव सादर झालेले आहे. . उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत लक्ष्मी नगर मधील सर्व्हे नं.३७/२ येथील खेळाचे मैदान/उद्यान विकसित करणेकामी करता श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदा दरास मान्यता मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४७ मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत दक्षता पोलीस कॉलनी गट क्र.उपविभाग ९०/२ प्रभाग जुना १६ येथील खेळाचे मैदान/उद्यान विकसित करणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६२५ दिनांक ०३/१२/२०२५**

मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत दक्षता पोलीस कॉलनी गट क्र.उपविभाग ९०/२ प्रभाग जुना १६ येथील खेळाचे मैदान/उद्यान विकसित करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/ क/कक्ष-५/नपाप्र/बांध/ १००१/ २०२५-२६ दि.११/११/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ३९,९५,११७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२०५/२०२५-२६ दि. २९/१०/२०२५ अन्वये रक्कम रु. ३९,९५,११७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयांना रक्कम भरून निविदा दर सादर केलेली आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदारा/ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. एकविरा कन्सट्रक्शन | अंदाजपत्रक दर | **सर्वात कमी दर** |
| २ | मे. गायत्री कन्सट्रक्शन | शे. ३.०० % जास्तीने | |
| ३ | मे. दिपेश सुभाषकुमार लिलवाणी | शे. ४.०० % जास्तीने | |

सदर तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता श्री/ मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची निविदा सर्वात न्यूनतम दराचे ३९,९५,११७/- इतक्या रक्कमेचे असून अंदाजपत्रक दराने आहे.

वरिल प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री/मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रक आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री/मे.एकविरा कन्सट्रक्शन यांची अंदाजपत्रक दराने आलेले निविदा दर प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व प्रस्तावानुसार, मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत दक्षता पोलीस कॉलनी गट क्र.उपविभाग ९०/२ प्रभाग जुना १६ येथील खेळाचे मैदान/उद्यान विकसित करणेकामी श्री/मे.एकविरा कन्सट्रक्शन यांचे अंदाजपत्रक दराने आलेल्या निविदा दरास मान्यता वाचा क्र. १ व २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांक:-६४८ मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत धुळे मनपा अंतर्गत स.नं.२१ गवळे नगर देवपूर येथे कंपाऊंड वॉल बांधकाम करणेकामी निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

मा. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक कंपाऊंड वॉलचे विषय घेत आहात त्यात मनपाचे लोगो किंवा सिंबॉल डेव्हलप करावा म्हणजे लोकांना लक्षात येईल की ही जागा धुळे मनपाच्या मालकीची आहे. सदर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६२६ दिनांक ०३/१२/२०२५**

मुलभूत सोई सुविधांचा विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत धुळे मनपा अंतर्गत स.नं.२१ गवळे नगर देवपूर येथे कंपाऊंड वॉल बांधकाम करणे बाबतच्या कामास धुळे म.जिल्हाधिकारी सो., यांचे पत्र क्रमांक १२/क/कक्ष-५/नपाप्र/बांध/१००१/ २०२५-२६

दि.११/११/२०२५ यांनी उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु.२९,९९,६०७/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत कार्य.अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./२०६/२०२५-२६ दि. २९/१०/२०२५ अन्वये रक्कम रु.२९,९९,६०७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

